# स्त्रीवाद
## (स्वरुप आणि प्रासंगिकता)




संपादक
डॉ. संदीप बी. काळे

| | | |
|---|---|---|
| 15 | आर्थिक स्त्रीवाद **प्रा. डॉ. वर्षा गंगणे** | 116 |
| 16 | स्त्रीवादी सिध्दांत आणि स्त्री—पुरूष असमानता **प्रा. डॉ. विजया या. मुळे** | 122 |
| 17 | स्त्रीवाद महिला सबलीकरण **डॉ.सुषमा शंकरराव प्रधान** | 132 |
| 18 | महिला सबलीकरणाची मध्ययुगीन पार्श्वभूमी **डॉ. जयदेवी पवार** | 139 |
| 19 | मराठी स्त्रीवादी साहित्य **प्रा. डॉ. वैशाली जाधव** | 145 |
| 20 | स्त्रीवादी मानसशास्त्र **सौ.सविता दरेकर** | 150 |
| 21 | स्त्री सुधारणा व कर्मवीर व्यंकटराव रणधीर **आबासाहेब माणिकराव देशमुख** | 162 |
| 22 | अनसूयाबाई आणि मी:स्त्रीवादी पाहाणी(पु.बा.काळे) **डॉ.रंजना श्रीकांत नेमाडे** | 166 |
| 23 | भारतीय स्त्रीवाद : संकल्पना आणि मुद्दे **मरकंटे कौशल्या रामचंद्र** | 177 |
| 24 | स्त्रीवाद आणि महिला सबलीकरण **प्रा. अरुण डी. मोरे** | 183 |

# अनसूयाबाई आणि मी:स्त्रीवादी पाहाणी(पु.बा.काळे)

डॉ.रंजना श्रीकांत नेमाडे

अनसूयाबाई आणि मी हे काळे यांचे आत्मचरित्र आहे.काळे यांनी स्वतःचे कर्तृत्व सांगण्यासाठी आत्मचित्र काढण्यासाठी हे आत्मचरित्र लिहिले नसून ते त्यांनी पत्नीचे काढलेले स्वभावचित्र आहे. यात त्यांनी असे म्हटले आहे की गाड्याबरोबर नळयाची यात्रा या न्यायाने बाईंच्या चरित्राबरोबर यात ओघाओघाने माझेही आत्मचरित्र अंधुक येऊन गेले व पर्यायाने बाईंची इच्छा काही अंशी तृप्त झाली. त्यांचे हे उद्गार विनयाचे किंवा नम्रतेचे नसून खरेच आहेत. या आत्मचरित्रातून काळे यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नीचे अनुसयाबाईचे व्यक्तिमत्त्व आपल्या मनात ठसते. या आत्मचरित्रात काळे यांनी स्वतःला केंद्रस्थानी न ठेवता पत्नीला केंद्रस्थानी ठेवले आहे.आत्मचरित्र भर काळे यांचे विचार आणि वर्तन स्त्रीवादी विचारांच्या जवळ जाणारे आहे.भारतात ताराबाई शिंदे यांच्या "स्त्री-पुरुष तुलना" पासून स्त्रीवादी विचारांची मांडणी झाल्याचे दिसून येते नंतर अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधले.त्यामागे स्त्रियांना बरोबरीचे स्थान देणे हा हेतू नव्हता.पाश्तात्य जगतात स्त्रीवादाची लाट आल्यानंतर त्या विचाराने भारतातील स्त्रीवादाचे पुनरुज्जीवन झाले.शिवाय भारतात स्त्रीवादाचा उदय स्त्रीमुक्तीच्या रुपात झाला.ब्रिटीशांनी आधुनिक शिक्षणाचा पाया घातल्यावर सर्व जरीध्मातील लोकांना शिक्षण खुले झाले.ब्राम्हो समाज,प्रार्थना समाज,आर्य समाज,रामकृष्ण मिशन,सार्वजनिक सत्यधर्म असे नवे संप्रदाय निर्माण झाले.सतीची प्रथा,विधवा विवाहाद्रील बंदी,केशवपन बाला-जरठ विवाह याप्रथांविरुध्द समाजसुधारकांनी लोकमत तयार केले.यात राजा राम मोहन रॉय,ईश्वरचंद्र विद्यासागर,लोकहितवादी,म.जोतीराव फुले,सावित्रीबाई फुले,ताराबाई शिंदे,पंडिता रमाबाई,न्यायमूर्ती रानडे,गोपाल गणेश आगरकर यांचा समावेश आहे.नंतरच्या काळात धोंडो केशव कर्वे म.गांधी, दादा धर्माधिकारी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीमुक्तीच्या संदर्भात मोलाचे काम केले.असे असले तरी या समाजसुधारकांच्या विचारात एकवाक्यता नाही.त्यांनी स्त्रियांच्या एखाद्याच मुद्द्याचा आग्रह धरलेला दिसतो.

म. फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकांमध्ये मनुष्य जातीला जन्म देणारी संगोपन, संवर्धन करणारी स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे असे मत मांडले आहे. स्त्रीचे उपजत गुण म्हणजे निरपेक्ष बुद्धीने ती करत असलेले जन्म देणे,मलमूत्र

ाळे)

ाळे यांनी स्वतःचे
ड़ले नसून ते त्यांनी
की गाड्याबरोबर
घाओघाने माझेही
ा तृप्त झाली. त्यांचे
मचरित्रातून काळे
मनात ठसते. या
ा केंद्रस्थानी ठेवले
विचारांच्या जवळ
" पासून स्त्रीवादी
रकांनी स्त्रियांच्या
थान देणे हा हेतू
चाराने भारतातील
स्त्रीमुक्तीच्या रुपात
ीध्मातील लोकांना
समाज,रामकृष्ण
तीची प्रथा,विधवा
समाजसुधारकांनी
ा रॉय,ईश्वरचंद्र
राबाई शिंदे,पंडिता
वेश आहे.नंतरच्या
हेब आंबेडकर यांनी
समाजसुधारकांच्या
ाचा आग्रह धरलेला

ानुष्य जातीला जन्म
से मत मांडले आहे.
ा जन्म देणे,मलमूत्र





काढणे, लालन पालन करणे ,काळजी वाहणे, वैधव्यात सती जाणे, त्यागमय जीवन जगणे हेच असल्याचे मानतात .पण त्याचा अर्थ त्या काळाची मर्यादा लक्षात घेऊन लावावा लागतो .त्यांनी या पुस्तकात उच्च-नीच उतरंडी विरोधी श्रम करणाऱ्यांना मान देणारी लोकशाहीवादी अशी मूल्ये मांडली आहेत. विशेष म्हणजे स्त्रियांचा उल्लेख करून स्त्री-पुरुष समानतेचे महत्व जोर देऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाची कारणे त्यांच्या नैसर्गिक शरीर धर्मात नसून पुरुषांच्या कावेबाजपणात आहेत याची जाणीव त्यांना झाली होती .आपल्या मानवी हक्कांची जाणीव होण्यास स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे याची कल्पना त्यांना असल्यामुळेच स्त्री शूद्रांना शिक्षणाचा आग्रह त्यांनी धरला. स्त्री-पुरुष समतेचा विचार मात्र त्यांनी आपल्या अखेरच्या आयुष्यात मांडला. फुले यांनी समाजाचा रोष पत्करून स्त्रियांच्या उन्नती करता प्रयत्न केले .केशवपन, बालविवाह ,सतीची चाल यासारख्या रुढींना विरोध केला. केशवपनास विरोध म्हणून न्हाव्यांचा संप घडवून यात पुढाकार घेतला. बालहत्या, भ्रूणहत्या होऊ नये यासाठी आश्रम सुरू केले. विधवांना कलंक असणाऱ्या बाळंतपणासाठी आश्रम सुरु केले .

ताराबाई शिंदे या समाजसुधारक किंवा कार्यकर्त्या नसतानाही स्त्री पुरुष तुलना या पुस्तकामध्ये समाजातील रूढीविरुद्ध आणि पुरूषांमध्ये असणाऱ्या दुर्गुणाविरुद्ध परखडपणे लिहिले आहे.आपल्या लेखनात त्यांनी स्त्रिया सर्व सद्गुणी आणि पुरुष सर्व दुर्गुणी अशी भूमिका घेतलेली नाही .मात्र पुरुष आणि स्त्री या दोघांमध्ये पुरुषाला प्राधान्य देऊन स्त्रीला कनिष्ठ ठरवण्याचा कावा सत्तासंबंधावर आधारित आहे. त्यामागे एखादे तर्कशास्त्र नाही याचे भान ठेवून त्या पुरुषांची दगाबाजी आणि पक्षपातीपणा उघड करतात. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी शिक्षणाला आणि पुनर्विवाहाला चालना देण्याचे कार्य केले.

रमाबाई पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. स्त्री धर्मनीती या त्यांच्या ग्रंथात त्यांनी स्त्रियांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले असले तरी गृहकृत्यास योग्य असे शिक्षण घेण्यावर भर दिला आहे. म. गांधी स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये स्त्रीला थोर मानतात. अन्यायी पतीचा त्याग करण्यास संमती असली तरी त्यांच्या विचारात पारंपारिकता दिसते. स्त्रियांना शिक्षण आवश्यक आहे असे ते म्हणतात. पण ते शिक्षण पुरुषांपेक्षा वेगळे असावे. नाहीतर स्त्री-पुरुषांचा जीवन विकास पूर्णपणे करणे शक्य होणार नाही. असे त्यांना वाटते. एका विशिष्ट वयानंतर स्त्रियांसाठी निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षणाची योजना आवश्यक आहे. गृहव्यवस्था, गरोदरपणातील आरोग्य, बालकांचे पालन-पोषण इत्यादी विषयांचे ज्ञान तिला देणे आवश्यक आहे. स्त्री स्वातंत्र्यासाठी

पुरुष वर्गाचा त्यांच्या विषयीचा दृष्टीकोन वदलणे त्यानुसार आचरण पालटणे आवश्यक आहे. असे ते म्हणतात. स्त्री पुरुष यांचा संसारातील दर्जा समान मानत असले तरी त्यांच्या कामात भेद आहे. घरात राज्य करण्याचा अधिकार स्त्रीचा आहे. तर बाहेरच्या व्यवस्थेचा धनी पुरुष आहे. पुरुष चरितार्थाचे साधन मिळणारा, तर स्त्री पैशाचा खर्च व संग्रह करणारी, मुलांची पालन कर्ती,जीवन घडवणारी आहे. असे ते म्हणतात. त्यांचे स्त्रीविषयक,स्त्रीशिक्षण विषयक विचार पाहिले तर आजच्या स्त्रीवादी विचारांच्या विरोधी जाणारे दिसतात. स्त्री नम्र,सहनशक्तीची मूर्ती, मर्यादशील, प्रेमळ असते. असे ते म्हणतात. त्यांनी स्त्रीच्या जीवनात मातृत्वाला महत्त्वाचे स्थान दिले होते. प्रत्येक स्त्रीने विवाह करावा असे गांधीजींना अभिप्रेत नव्हते. सामाजिक कार्यासाठी अधिकाधिक स्त्रियांनी अविवाहित राहण्याचा संकल्प करावा असे त्यांना वाटे. त्यांना मातृत्वाच्या संकल्पनेचा पत्नीत्वाशी आणि पुरुषाशी संबंध नाही. ती भावनिक अवस्था असून सांस्कृतिक आशयाने भरलेली संकल्पना वाटते.गांधीजींनी दिलेल्या आवाजामुळे स्त्रिया स्वातंत्र्यलढ्यासाठी बाहेर पडल्या तरी त्यांनी पिछाडीची कामे केली.भूमिगतांना निरोप पोचवणे, अन्न पोहोचवणे अशा घरगुती कामांचा विस्तार होता.

दादा धर्माधिकारी हे गांधीजींचे शिष्य असले तरी स्त्रीवादी विचारसरणीला समांतर असे विचार स्त्रियांसंदर्भात मांडले आहे., स्त्रीवादी विचारसरणी पुरुष आणि स्त्रियांच्या स्वभावात मूलत: भिन्नता असते हा विचार नाकारते. दादा धर्माधिकारी यांनीही हा विचार मांडला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्वातंत्र्यासाठी हिंदू कोड बिलामध्ये अनेक उपाय सुचवलेले आहेत. घटस्फोटाचा हक्क स्त्रियांना मिळवून दिला. वारसा हक्क देण्याची शिफारस केली. पुरुषावर एकपत्नीत्वाचे बंधन घातले. सामाजिक समतेच्या बरोबर स्त्री पुरुष समानतेवर त्यांनी भर दिला. दारू पिऊन येणाऱ्या नवऱ्याला घरात प्रवेश देऊ नये. यासाठी मार सहन करण्याची तयारी ठेवूनही नवऱ्याला व्यसनमुक्त करण्यास ते सांगतात.

गोपाळ गणेश आगरकर यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करताना स्त्रियांनाही स्वातंत्र्य असावे असे म्हटले आहे. पुरुषांना जे जे स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार आहे ते सर्व स्त्रियांना दिले पाहिजेत. पुरुषांना जे शिक्षण आपण देतो ते सर्व शिक्षण स्त्रियांनाही द्यावे. शिवाय ते एकत्र द्यावे असा त्यांचा आग्रह होता. तिला कोणत्याही व्यवसायाचे स्वातंत्र्य असावे. असे त्यांचे मत आहे. त्यांनी स्त्री शिक्षण, अर्थार्जन, स्वयंवर, घटस्फोट, पुनर्विवाह, संततिनियमन यासारख्या सर्व सुधारणांचा पुरस्कार केला.विशेष म्हणजे हे हक्क फक्त उच्चवर्णीयांनाच नव्हे तर सर्व स्त्रियांना मिळावेत असे त्यांचे मत होते.

चरण पालटणे
समान मानत
र स्त्रीचा आहे.
मिळणारा, तर
गारी आहे. असे
तर आजच्या
शक्तीची मूर्ती,
ात मातृत्वाला
जींना अभिप्रेत
हण्याचा संकल्प
आणि पुरुषाशी
लेली संकल्पना
बाहेर पडल्या
पोहोचवणे अशा

तरी स्त्रीवादी
आहे., स्त्रीवादी
सते हा विचार

ो स्वातंत्र्यासाठी
ा हक्क स्त्रियांना
पत्नीत्वाचे बंधन
भर दिला. दारू
सहन करण्याची

रस्कार करताना
तंत्र्य, हक्क आणि
आपण देता ते सर्व
ग्रह होता. तिला
ांनी स्त्री शिक्षण,
सर्व सुधारणांचा
तर सर्व स्त्रियांना





यावरून असे दिसते कि या समाजसुधारकांच्या विचारात एकवाक्यता नाही.असे असले तरी भारतीय समाजात स्त्रियांच्या प्रश्नाकडे यामुळेच लक्ष गेले.स्त्रियांचे आरोग्य,शिक्षण,सार्वजनिक जीवनात त्यांनी काम करणे याला मान्यता मिळाली.हा वैचारिक गोंधळ पु.बा.काळे याच्यातही दिसतो.

सन 1890 मध्ये जन्म झालेले काळे समाजसुधारणा किंवा स्त्री दास्यविमोचनाच्या कोणत्याही चळवळीत ओढले गेले नव्हते. त्यांचा अशा चळवळींशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध नव्हता तरीही त्यांचे पत्नीशी असलेले वर्तन स्त्रीवादी दिसून येते. एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ते स्वीकारतात. यामुळेच या आत्मचरित्राचे महत्त्व आहे.

काळे यांचे अनसूयाबाईशी लग्न होण्यापूर्वी एक लग्न झाले होते. आईच्या आग्रहामुळे तिला सुख द्यावे म्हणून त्यांनी हे लग्न केले. पण इ.स.1913 मध्ये पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतर मात्र आईने आग्रह करूनही त्यांनी लग्नास नकार दिला. 1914 मध्ये अनुसयाबाईनी फर्ग्यसनमध्ये प्रवेश घेतला तेव्हा काळे तिथेच शिकत होते. कॉलेजमध्येच त्यांची प्रथम दृष्टादृष्ट झाली. पुढे काळे यांच्या चुलत बहिणीच्या मध्यस्थीने त्यांनी अनसूयाशी पत्रव्यवहार सुरू केला. त्यात अनुसया प्रेमाचा अंकुर अभिव्यक्त करणे कटाक्षाने टाळायची असे काळे म्हणतात. तिच्या भावाने तिचे लग्न एका गृहस्थाशी ठरवले. त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहार बंद पडला. तिचे लग्न ठरविल्यामुळे काळे निराश झाले. नंतर तिच्या भावाने ते लग्न मोडले. पण अनसूयाबाईचे लग्न ठरल्यामुळे काळे निराश झाले. दुसऱ्या मुलीशी लग्न करायचे नाही असा निश्चय करून त्यांनी सैन्यात कमीशन मिळवण्याचा प्रयत्न केला. ते जमले नाही.त्यामुळे अमेरिकेला स्थायिक होण्याचा विचार केला. पण अचानकपणे 1916 मध्ये अनसूयाच्या भावाचे मित्र आणि त्यांच्या चुलत बहिणीचे दीर बाबासाहेब लिमये यांनी केलेल्या पत्रव्यवहारामुळे त्यांचे अनसूयाबाईशी लग्न ठरले. अनसूया सुंदर नव्हती तिचा वेशही गबाळा असे.

हेडस्ट्रॉंग,मनस्वी,अन्यायाच्या विलक्षण कल्पना असणारी अशी होती. याची काळे यांना कल्पना असूनही ते तिच्याशीच लग्न करण्याचे ठरवतात. लग्नानंतर काळे यांचे अनसूयाबाईंशी ज्या रीतीने वागतात ते पाहिल्यास त्याच्या स्त्रीवादी वृत्तीची जाणीव होते.

अनसूयाबाईची मनस्थिती नॉर्मल नसल्यामुळे काळे त्यांना घेऊन नोकरीच्या गावी बंगलोरला गेले. तेथे त्यांचा संसाराचा महिना-दीड महिना सुखाचा गेला. त्यानंतर त्यांना डोहाळे लागले. त्यांच्या अब्सेंस विल पॉवर या रोगाने उचल खाल्ली.त्यात त्यांनी कोणालाही न सांगता धारवाड, बेळगाव, पुणे नंतर नाशिकला गेल्या. त्यांना काळे यांच्या आईने आणि मामाने परत बेंगलोरला आणले. पुण्यात

बाळंत होऊन मुलगा झाल्यावर चौथ्या दिवशी पुन्हा कुणाला न सांगता त्या काळे यांना शोधण्याकरता पर्वतीकडे पायी गेल्या.तेव्हा काळे जमशेटपूरला होते. पूर्ण वर्षभर बाईंनी हे आजारपण काढले.या आजारातील खस्ता काळे यांच्या आईने काढल्या. आईच्या मृत्यूनंतर काळे जमशेदपूरवरून पुण्याला आल्यावर अनसूयाबाईंनी त्यांना शिव्या दिल्या,निरांजन फेकून मारले. पुन्हा दिवस गेल्यानंतरच्या डोहाळयात कोणालाही अद्वातद्वा बोलल्या. मुलांच्या मुंजी करता पाहुणे जमा झाले असताना काही कारणानिमित्त बाई बाहेर गेल्या असताना सरबत पिण्याची टूम निघाली. म्हणून सरबत करून प्यायल्यावर बाई आल्यावर आपल्या अपरोक्ष सरबत केले म्हणजे आपला अपमान झाला असे त्यांना वाटले. त्या सर्व पाहुण्यांना खूप बोलल्या. आपल्या लग्नाच्या वेळी चांदीची भांडी गहाण ठेवून लग्न सोहळा करावा लागल्याने लग्नाच्या सिल्व्हर जुबिलीला काळे यांनी नवीन चांदीची भांडी बाईंना भेट दिली. तेव्हा त्यांनी मनावर ताबा न ठेवता रडारड केली.यासारखा बाईंचा विक्षिप्तपणा काळे सहन करतात. नाइलाजाने काही दिवस त्यांना पुण्याच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये ठेवतात. जमशेदपूरला गेल्यावरही बाईंना संतापाचे झटके येत असत. अनसूयाबाईंचे हे वर्तन ते सहन करतात.इतकेच नाही तर बाईंना उद्योग असला म्हणजे त्यांना अवांतर गोष्टीकडे लक्ष द्यायला आणि काळे यांना संतापण्याला अवकाश मिळू नये म्हणून ते त्यांना आदिवासी मुलामुलींची शाळा चालवण्यास प्रोत्साहन देतात. संधी आल्यावर बाईंना मध्यप्रांत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलर म्हणून जाण्यास काळे तयार करतात. यानंतर बाई सार्वजनिक कामांमध्ये रमून जातात. स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक कुटुंबातून एक शिपाई देण्याचे आवाहन केल्यावर काळे यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्याची इच्छा व्यक्त करतात. त्याला बाई विरोध करतात. स्वतः स्वातंत्र्यलढ्यात जाण्याची युक्ती काढतात.शेवटी पंधरा दिवस विचारविनिमय करुन काळे यांनी धंद्यात राहायचे आणि अनसूयाबाईंनी स्वातंत्र्यलढ्यात जायचे ठरते. 1952 च्या निवडणुकीसाठी उभे राहण्यास काळे त्यांना प्रोत्साहन देतात.प्रचारात मदत करतात.त्या निवडूनही येतात. तसेच 1957 च्या पार्लमेंटच्या निवडणुकीतही त्या उभ्या राहिल्यावर काळे त्यांना मदत करतात. त्यांचे 1967-68 यात इलेक्शन एजंट म्हणून काम पाहतात.यावेळीही त्या निवडून येतात. आपल्या पत्नीला मनात संताप होण्यास वेळ मिळू नये म्हणून काळे पत्नीच्या कर्तृत्वाला वाव देताना दिसतात. आवाहनानंतर स्वातंत्र्यलढ्यात जाण्याची त्यांची स्वतःची इच्छा असली तरी अनसूयाबाईंना जाण्यासाठी परवानगी देतात. त्यांना त्यामध्ये सहकार्यही करतात.कॉंग्रेसचा प्रचार करताना खेडेगावातून परत यायला रात्रीचे दोन-दोन तीन-तीन वाजत असत. तेव्हा त्यांचे आणि माझे कार्यक्षेत्र बदलले

ांगता त्या काळे
्रला होते. पूर्ण
ः यांच्या आईने
ाला आल्यावर
पुन्हा दिवस
ाया मुंजी करता
असताना सरबत
ल्यावर आपल्या
वाटले. त्या सर्व
ाहाण ठेवून लग्न
नवीन चांदीची
ः केली.यासारखा
त्यांना पुण्याच्या
ााराचे झटके रात
ः बाईंना उद्योग
ांना संतापण्याला
ळा चालवण्यास
कौन्सिलर म्हणून
ये रमून जातात.
ाावर काळे यांनी
विरोध करतात.
ा विचारविनिमय
ायलक्ष्यात जायचे
यांना प्रोत्साहन
च्या पार्लमेंटच्या
त. त्यांचे 1967-
निवडून येतात.
ा काळे पत्नीच्या
जाण्याची त्यांची
गी देतात. त्यांना
तून परत यायला
ा कार्यक्षेत्र बदलले





होते. त्याचे परिणाम भोगायला आम्ही दोघेही तयार होतो असा समजूतदारपणा दाखवतात.

त्यांचे लग्न झाल्यानंतरच्या काळात त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची होती.अनसूयाबाईंच्या आजारामुळे त्या काही म्हणतील त्याला कबूल होत होत्या. हे योग्य नाही याची जाणीव काळे यांना होती. ते म्हणतात-मला त्यांचे स्वत्व मारायचे नव्हते. पण मी तरी काय करू शकत होतो. कारण आर्थिक परिस्थितीने मला अगदी भंडावून सोडले होते.आमचे नातेवाईक आम्हाला हिडीसफिडीस करत होते. कुणाहीकडे स्वागत होत नव्हते.आम्ही जगात एकटे पडलो होतो. हे सांगत असताना त्यांच्या मनात पत्नीच्या स्वतंत्र मताला किंमत देण्याची त्याची कदर करण्याची खरी इच्छा होती असे दिसून येते. त्यामुळे त्यांनी पत्नीच्या कर्तृत्वास वाव मिळण्यासाठी प्रयत्न केला. मदत केली. एवढ्यावरच न थांबता ते त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुकही करतात. त्यातूनच पिकेटिंग करताना चार महिन्यांची त्यांना झालेली शिक्षा, चिमूरच्या दंगलीतील भीतीग्रस्त स्त्रियांना धीर देऊन जमेल तेवढी माहिती गोळा करणे, नागपूरच्या दंगलीतील प्रकरणात ज्यांना फाशी झाली होती.त्यांच्यासाठी फाशी निवारण समिती करता निधी जमवण्यासाठी श्रम करणे, आपले सर्व प्राण शक्तीपणास लावून त्यांनी सात जणांची फाशी माफ करून घेणे, महिला परिषदेच्या अध्यक्षपदावरून संततिनियमन आणि सोशल अफेअरस करता पोर्टफोलिओ समस्येला वाचा फोडणे यासारख्या कर्तृत्वाचे कौतुक करतात.

परंपरेने जे गुण स्त्रियांना नाकारले होते अशा बाईंच्या गुणांचा उल्लेख काळे करतात. त्यांचा (हेडस्ट्रॉंग) मनस्वी, तापट स्वभाव, मनासारख्या गोष्टी झाल्या नाहीत तर तोल सुटणे, टापटीप व नीटनेटके राहणे न जमणे, पुरुषांची बोलण्यात आत्मविश्वास, कलाकुसरीच्या कामाची नावड विणण्याशिवण्याचा कंटाळा, उत्तम अस्खलित बोलणे, कोणाच्या आहारी न जाता फटकून बोलणे व वागणे, तोंडाच्या फटकळ, संततिनियमनाचा सारख्या विषयावर धीटपणे गांधीजींची चर्चा करणे, यासारखे गुण ते उल्लेखतात. त्याचबरोबर त्यांची प्रसिद्धी पराङ:मुखता,न्यायाच्या बाबतीत तंतोतंत पणा या गुणांचाही उल्लेख करतात. बाईंचा पिंड मातेचा होता असे सांगून अभ्यंकरांनी बाईंकडून राजकारणात उतरण्याची अपेक्षा केल्यावर मी स्त्री आहे म्हणजे माझे मातेचे कर्तृत्व मला प्रथम पार पाडले पाहिजे. ते साधून जे काही राजकारण किंवा समाजकारण करता येईल तेवढेच मी करेल. त्यामुळे मी राजकारणात पुढे आले नाही तरी चालेल मी फक्त शिपाई म्हणून राहण्यास तयार आहे. असे बाईंनी अभ्यंकर यांना दिलेले उत्तरहीमान्य करून त्यांच्या मातृत्व भावनेचा ते आदर करताना दिसतात. आपल्या सार्वजनिक कामामुळे मुलांकडे आपले दुर्लक्ष होते असे अनसूयाबाईंना वाटे. त्या तुरुंगात असताना तेथे मिळणारे दूध त्या धाकट्या मुलांसाठी ठेवत. असा त्यांच्या मातृप्रेमाचा उल्लेख करतात.

यावरोबरच तळेगावला असताना बाई विहिरीचे पाणी काढणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे ही कामे कोणतीही कुरकुर न करता करत. तसेच त्या स्वयंपाकात निष्णात होत्या. त्यांना स्वयंपाकाची आवड होती. प्रकृतीने त्या सुदृढ होत्या. 1920 नंतर त्यांना आजार माहीत नव्हता. त्या अत्यंत हलक्या मनाच्या व मनाच्या शुद्ध व प्रेमळ होत्या. अशा परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या गुणांचाही उल्लेख करतात. परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या आणि नाकारलेल्या गुणांची ते सहज नोंद घेतात. त्यात कोणताही अभिनिवेश दिसत नाही. किंवा अनसूयाबाईंनी ते गुण बदलावेत असाही त्यांचा आग्रह नाही. पत्नीला एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून स्वीकारण्याची त्यांची तयारी दिसते. म्हणूनच बाईंना आर्थिक स्वातंत्र्य ही मिळावे अशा काळे यांच्या इच्छेनुसार 1926 मध्ये यांच्याच पैशातून त्यांच्या नावाने घर घेतात. पत्नीला आपल्या नंतरही मुला-सुनांवर अवलंबून राहावे लागू नये, म्हणून काळे फाउंडेशन ट्रस्टला त्यांचे घर देईपर्यंत ते सर्वस्वी बाईंचे होते. नंतरही ट्रस्टच्या त्या पगारी मॅनेजिंग ट्रस्टी होत्या. पुरुष वर्ग स्त्रियांची कुचेष्टा करतो. स्त्री वरून शिवीगाळी करतो याचा बाईंना भयंकर राग. जणूकाही त्या पापाचा धनी एकटी स्त्रीच. या बाईंच्या मताचा उल्लेख करून स्त्रीला स्वतःचे अस्तित्व असते, तिला मन असते आशा-आकांक्षा असतात त्या तिने संसार सांभाळून पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्याकरता तिला व्यवहार समजला पाहिजे तिने स्वतःचे निर्णय घेण्याची शक्ती कमावली पाहिजे आणि स्वतःचे अस्तित्व आपल्या घरच्या मंडळींना जाणवून दिले पाहिजे या अनसूयाबाईंच्या स्त्रीवादाची जुळणाऱ्या मताचा काळे आदर करतात. अभ्यंकरांनी अनुसूया बाईंना राजकारणात पूर्णवेळ काम करण्याची गळ घालण्याचे काम काळे यांना सांगितले तरी ते बाईच्या त्यासाठी असलेल्या नकाराचा आदर करतात. परस्परविरोधी आचार-विचार यांमुळे त्यांची नेहमी कडाक्याची भांडणे होत असत. असे असतानाही काळे यांची इच्छा तृप्त करण्याकरता सर्व नातेवाईक विरुद्ध असूनही बाईंनी त्यांना प्रोत्साहन दिले. लग्नाच्या पहिल्या चार वर्षात आजार हालअपेष्टा यातून तावून सुलाखून त्या बाहेर पडल्या. शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ही काळे यांच्यावर प्रभाव पडू लागला. म्हणून बाईंनी Peace at home at any cost असे ठरवले. शिवाय या वेळेपावतो बाईंना सहा मुले झाली होती. तेव्हा त्याही हलकी हलकी शांत होत होत्या. या सर्वांचा परिणाम म्हणून की काय आमचे भांडण याचे प्रकार कमी कमी होऊ लागले. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रेमामुळे त्यांनी अनसूयाबाईशी लग्न केले तरी नंतर त्यांच्या सहवासातून प्रेम निर्माण झाल्याचे दिसते.

बाईंच्या तामसीपणाची झळ काळे यांना नेहमीच सोसावी लागली तरी बाईंच्या शुद्ध अंतकरणाची त्यांना कल्पना आहे. ते म्हणतात, मनात मत्सर नसेल एकदा आपला राग ओकून टाकल्यावर त्या सर्व विसरत असत. मग त्यांच्या शुद्ध

अंतःकरणाचा प्रत्यय येई. तसेच त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची होती तेव्हा बाईंनी दाखवलेला मनाचा सुसंस्कृतपणा, तळेगावला गरिबीत दिवस काढावे लागल्यावर त्या जीवनात प्रत्यक्ष सहभागी होणे याचीही त्यांना जाणीव आहे. अनसूयाबाईचे काळे यांच्याशी लग्न होण्यापूर्वी लग्न ठरून मोडले होते. ते लग्न त्यांच्या भावाने ठरवले होते. भावानेच लग्न ठरवून ते मोडले. त्यावर ते म्हणतात, पण ठरलेले लग्न मोडणे यात मुलींना कमीपणा वाटतो या घटनेचा अनसूयाच्या मेंदूवर वाईट परिणाम झाला. यातून पत्नीच्या मनाचा विचार करण्याची त्यांची वृत्ती दिसते.

अनसूयाबाईंचा धाकटा भाऊ काशिनाथ याचा बुडून मृत्यू झाला. त्यांची धाकटी बहीण वत्सला आणि वहिनी प्लेगला बळी पडल्या. त्यांची आठवण त्या काढत. तेव्हा मेलेल्या माणसाबद्दल अधिक प्रेम वाटते म्हणून म्हणा किंवा ती तशीच गुणी होती म्हणून म्हणा, पण बाई शेवटपर्यंत काशिनाथ, वत्सला या भावंडांबद्दल हळहळत, बाईंच्या काँग्रेसमधील कार्याचा आढावा घेताना ते म्हणतात बाईंनी स्वतः काँग्रेसमध्ये कार्य केले पण मध्यमवर्गीय स्त्री कार्यकर्त्यांना, स्पष्टच बोलायचे म्हणजे पांढरपेशा स्त्री कार्यकर्त्यांना त्या काँग्रेसमध्ये ओढू शकल्या नाहीत.असे म्हणतात. यावरून एखाद्या घटनेबद्दल सारासार विचार करण्याची वृत्ती, बाईमधील गुणांचा उल्लेख करताना त्यांची उणिवाही दाखवणे ही समतोल वृत्ती काळेयांच्यात दिसते.

काळे केवळ अनुसयाबाई यांच्या मनाचा विचार करून त्यांच्या मताचा आदर दाखवून, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य देऊन, त्यांना व्यक्ती म्हणून मान्यता देतात असे नव्हे तर बाईंच्या माहेरच्या घरातील वातावरण पाठांतराला, व्यासंगाला, बहुश्रुतपणाला अनुकूल होते. तर काळे यांच्या घरात फारसे कोणी शिकलेले नव्हते. राहण्याची पद्धत जुनी. त्यामुळे लहानपणी आईबरोबर सकाळी ज्या काही भुपाळ्या ते म्हणत असेत तेवढेच माझे पाठांतर होते. माझ्यापेक्षा बाईंची संस्कृत, मराठी अथवा इंग्रजी वाङ्मयावरील झेप फार मोठी होती. त्यामुळे माझ्यातील हे वैषम्य त्यांना जाणवत असे.वाङ्मयीन रसास्वाद बाईंच्या बरोबरीने घेण्यास असमर्थ असणे,आपण भोळे, बोलण्यातही व्यंग किंवा बाई उत्तम अस्खलित बोलणाऱ्या तर मी बोबडा. बाई जास्त व्यवहारी, हात राखून खर्च करणाऱ्या, तर आपण उधळे, पुरुषांना शत्रू जास्त, बायकांना कमी शिवाय बाई वागण्यात, विचारात राहसा कोणाच्या आहारी न जाणाऱ्या व प्रसंगी फटकून बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या अशा शब्दात बाईंच्या तुलनेत आपल्यातील कमीपणा मान्य करतात. पत्नी आपल्यापेक्षा गुणांमध्ये वरचढ आहे हे मान्य करण्यास कचरत नाहीत. एवढेच नाही तर आपल्यापेक्षा बाई मध्ये असलेल्या वरचढ गुणांचे त्यांना कौतुक वाटते.

बाईंनी निवडलेल्या सुमतीबाई धनवटे उषाताई कोलते कुसुमताई वानखेडे यासारख्या सहकाऱ्याच्या निवडीविषयी काळे समाधान व्यक्त करतात. तसेच त्यांच्या पुरुष सहकाऱ्याच्या निवडीविषयीही आदराचे उद्गार काढतात. भाईजी

बियाणी, श्री सैवाल, पांडे, माधवराव देसाई नरकेसरी अभ्यंकर, डॉ. खेर या सहकारी मित्रांशी संबंध ठेवतात. तर बाईचा मत्सर करणारे पुरुषही आहेत याची जाणीव ठेवूनही ते त्याची नोंद घेतात. त्यात मावळणकर, डॉ. जीवराज मेहता यांचा समावेश आहे. एक प्रसंग ते आत्मचरित्र सांगतात. 1934 च्या डिसेंबरात नरकेसरी अभ्यंकर यांच्या शेवटच्या आजारात त्यांना भेटण्यासाठी बाई आणि काळे कडे अभ्यंकरांकडे गेले. तेथे महात्माजी होते. त्यांनी बाईंना "वैष्णवजन हे" भजन म्हणायला सांगितले. तेव्हा बाईंनी ते म्हटले. भजन म्हणताना अभ्यंकरांची दृष्टी बाईंनवर स्थिर झाली. काळेंना वाटले, अभ्यंकर यांचा आत्मा घुटमळत असल्याने त्यांना शांत मृत्यू यावा म्हणुन बाईंनी त्यांना एक मुका द्यावा. यावर बाईंनी ते तसे नाही, मी त्यांची निराशा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार मी पूर्णत्वाने राजकारण.न पडले नाही. आपल्या मागे नागपूरच्या राजकारणात पूर्ण अंधार आहे असा विचार आल्यामुळे त्यांना वाईट वाटत आहे.असे सांगितले. यानंतर अभ्यंकर यांना मुंबईला उपचारासाठी नेण्यात आले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या प्रसंगाबद्दल "माझी भूमिका"मध्ये ते म्हणतात, "माझी संस्कृती आणि विचारांची दिशा ही पाश्चिमात्य वळणाची आहे. आसन्नमरण माणसाची इच्छा तृप्त करणे हे पवित्र कर्तव्य मानलेले आहे". यातून मृताचा आत्मा शांत करण्याबरोबर आपण उदार मनाचे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न ते करतात.काही ठिकाणी मात्र काळे यांच्यातील पारंपरिक पुरुष डोके वर काढताना दिसतो.मनात मत्सराची भावना निर्माण झाल्यावर त्यावर विचारांनी नियंत्रण ठेवता येत नाही असेही दिसते. डेप्युटी कमिशनर मॅकघलागन या आयरिश गृहस्थाप्रमाणेच बाईंचा भाऊ दिसायचा. त्यामुळे त्यांच्या मनात मॅकघलागनविषयी आदर व प्रेम उत्पन्न झाले. तसे बाईंनी काळे यांना सांगितले. त्यात लैंगिक भावना नव्हती. तरी त्यामुळे काळे यांचा मत्सर जागृत झाला. त्यांची वेचैनी कमी न झाल्याने शेवटी बाईंनी त्यांच्याशी असलेले संबंध हलके हलके तोडून टाकले. या प्रसंगातून पारंपरिक पुरुषाप्रमाणे आपल्या पत्नीवर आपलीच मालकी असावी अशी काळे यांची भावना दिसते.

ज्यांनी त्यांचे लग्न जमवण्यासाठी प्रयत्न केले त्या बाबासाहेब लिमये यांनी ते आगीशी लग्न करीत आहेत असे सांगितल्यावर त्यांनी उत्तर दिले मी अग्नी विझवणार नाही नाही. मी त्याला काबूत आणीन.सेल्फ बुईल्ड माणसाच्या हातूनच काही कार्य होऊ शकते. आगीप्रमाणे असणाऱ्या पत्नीला काबूत आणणे याचा पुरुषार्थ आहे असा पारंपरिक विचारच येथे दिसून येतो.

तसेच अनसूयाबाई कऱ्हाडे असल्यामुळे वेदोक्त ब्राह्मण त्यांचे लग्न लावण्यास तयार नव्हते. अनसूयाबाईचा भाऊही लग्नास आला नाही. अनुसूयाने केलेला स्वयंपाक आईने खावा म्हणून त्यांना ऋतूशांतीचा होम करावा लागला. याचा उल्लेख करून ते म्हणतात, या दहापंधरा दिवसात मला निदान तीन-चार

८, डॉ. खेर या
ही आहेत यात्री
ाज मेहता यांचा
बरात नरकेसरी
ाणि काळे कडे
ाजन हे" भजन
भ्यंकरांची दृष्टी
मळत असल्याने
र बाईंनी ते तसे
ने राजकारणात
ाहे असा विचार
र यांना मुंबईला
गात्रद्दल "माझी
ही पाश्चिमात्य
कर्तव्य मानलेले
ाचे आहोत असे
पारंपरिक पुरुष
ल्यावर त्यावर
मॅकघलागन या
त्यांच्या मनात
यांना सांगितले.
त झाला. त्यांची
नके हलके तोडून
ापलीच मालकी

हेब लिमये यांनी
दिले मी अग्नी
ासाच्या हातूनच
गे यांचा पुरुषार्थ

ण त्यांचे लग्न
नाही. अनुसूयाने
करावा लागला.
नेदान तीन-चार





प्रसंगी तरी दुष्यंतासारखे सहज वागता आले असते. ज्या मुलीला मी माझ्या हृदयाची स्वामिनी म्हणून अंगिकारली तिचे कौमार्य धर्मसंस्कार यापूर्वी भ्रष्ट न करण्याची ताकद माझ्यात होती. येथे काळे स्वतःच्या वर्तनाचे उदात्तीकरण करून आपण अनसूयाबाईशी लग्न केले म्हणजे उपकारच केले. अशी भावना दिसते. तसेच लग्नानंतरही सतत कडाक्याची भांडणे होऊनही आमची एकमेकांवर प्रीती कायम होती असे सांगतात. कारण देताना म्हणतात, मी त्यांना माझी देवता समजत होतो. म्हणून त्यांच्यावरचे माझे प्रेम अखेरपर्यंत कायम टिकले. परंपरागत स्त्री-पुरुष कल्पनांमध्ये स्त्री देवता कल्पून तिची पूजा केली जाते. या विचारसरणीचा प्रभाव काळे यांच्यावर दिसतो. आपल्या अनसूयाविषयी आदर का निर्माण झाला हे सांगताना ते आपल्या आईची वैधव्यानंतरची स्थिती सांगतात. या सर्व गोष्टीचा आपल्या मनावर फार परिणाम झाला.आपल्याला घराचा तिटकारा आला आणि स्त्री जातीबद्दल ती अबला असल्यामुळे मनात विलक्षण आदर उत्पन्न झाला.तो आदर पुढे अनसूयाशी वागताना उपयोगी पडला. स्त्री अबला म्हणून तिचे संरक्षण करणे ही पुरुषांची जॅबाबदारी असल्याची त्यांची विचारसरणी येथे दिसते. खरे तर स्त्री अबला असल्यामुळे आदर निर्माण होणे हीच विसंगत भावना आहे. अबलेबद्दल वाटते ती सहानुभूती. स्त्रीवाद स्त्रियांसाठी अशी सहानुभूती असणे नाकारतो. अनसूयाबाईंना सात वर्षात पाच मुले झाली. बाळंतपणामुळे बाईंना शारीरिक त्रास होत नसला तरी त्यांना बाळंतपणाचा कंटाळा आला. सहावे मूल झाल्यानंतर बाईंनी कुटुंबनियोजनाचे उपाय पाहण्यास सुरुवात केली. काळे निसर्गाने घालून दिलेले नियम उल्लंघन होऊ नयेत म्हणून त्या विरुद्ध होते. पण डॉक्टर मेरी स्टोप आणि डॉक्टर विश्वेश्वराय यांच्या पुस्तकाच्या वाचनाने त्यांचे मत बदलले. मात्र ते पत्नीच्या शरीरस्वास्थ्यासाठी नाही तर ते मटेरियलिस्ट म्हणून. संततीची वाढ हिंदुस्थानच्या दुर्दैवाला व दारिद्र्याला कारणीभूत ठरते म्हणून. त्यांनी कॉन्ट्रासेफ्टीव्हज वापरण्यास सुरुवात केली. तरी सातवे मूल झाले. शेवटचे मूल बाई पस्तीस वर्षाच्या असताना झाल्यावर जास्त मुले नकोत म्हणून त्यांना व्हासिकटोमीचे ऑपरेशन करून घेतले. कुटुंबनियोजन करण्याची त्यांची वृत्ती पाहिली तर बाईंना काही तरी सार्वजनिक काम करण्याची तळमळ लागून राहिली होती म्हणून त्यांनी काही साधने वापरली तरी नंतर मात्र जास्त मुले नकोत. देशाचे दुर्दैव व दारिद्र्य यांचा प्रभाव पडून ते संततिनियमनाची शस्त्रक्रिया करताना दिसतात. बाईंच्या शेवटच्या आजारात ही त्यांची शुश्रुष करण्याची संधी आपणास मिळाली असे म्हणतात. खरे तर सहधर्मचारिणी या नात्याने ते त्यांचे कर्तव्यच होते. येथे मात्र शुश्रूषा करण्याचे श्रेय स्वतःकडे घेतात. पत्नीच्या कर्तृत्वास वाव देणारे, त्या राजकारणात समाजकारणात पडल्यावर सर्व तऱ्हेची मदत करणारे, बाईंच्या स्त्रीवादी विचारांशी जुळणाऱ्या मतांचा आदर करणारे, मुलाच्या औरसपणाबद्दल बाईंशी वाद घालणारे स्वतःचेही

स्त्रीवादी विचारांची साम्य असणारे काळे यांच्या पारंपारिक पुरुषी अहंकार ही काही प्रमाणात आढळतो. स्त्रियांना आदर देण्यामागचे त्यांचे कारण स्त्रीवाद विरोधी असल्याचे जाणवते. काळे यांच्या व्यक्तिमत्वास अशी विसंगती दिसून येते कारण, ते ज्या काळात वावरले त्या काळात आजच्या स्त्रीवादी विचारांचा उगमही झालेला नव्हता.

उच्चवर्णीय स्त्रियांच्या उद्धारासाठी म्हणून इंग्रजी शिक्षणाने व विचाराने समाजसुधारकांनी सुरुवात केली होती. त्यात त्यांच्या उद्धाराची भावना असली तरी स्त्री पुरुष समानतेची भावना नव्हती. केशवपन,बालविवाह, विधवांच्या पुनर्विवाहास उत्तेजन, स्त्रियांच्या शिक्षणासाठी उत्तेजन देणे असा मर्यादित हेतू त्यामागे होता. परंतु स्त्रियांकडे देवता म्हणून पाहण्याची पारंपारिक दृष्टी मात्र बदलली नव्हती. अशा काळात आपल्या पत्नीच्या मनाचा, मतांचा विचार करून तिच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणारे, वाव देणारे काळे त्यांच्या काळाच्या पुढे गेले आहेत असे दिसते. त्या वेळची परिस्थिती लक्षात घेता पत्नीच्या परंपरेच्या दृष्टीने स्त्री स्वभावास न शोभणाऱ्या गुणांचे कौतुकच करून त्यांच्या व्यक्तिमत्वास खीळ न घालता ते फुलवण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद आहे. "माझी भूमिका" मध्ये ते म्हणतात, पत्नीने जर पतीकडे आपला अन्नदाता, रक्षक किंवा मुलांचा जनक याच नात्याने केवळ पाहिले तर वैवाहिक जीवनात कधी गोडी उत्पन्न होणारच नाही. आपल्या पतीची आपण अर्धांगी आहोत. म्हणजेच आपले आणि त्यांचे नाते बरोबरीचे आहे. अशी तिची भावना असायला हवी. तसेच नवऱ्याने आपल्या बायकोला रखेली, दास व गुलाम आहे. असे समजता कामा नये. लग्न होण्यापूर्वी पती-पत्नीचे संबंध आणि वैवाहिक जीवन यांचे संबंध माझी धारणा अशा प्रकारची होऊन गेलेली होती. यावरूनही त्यांची वृत्ती स्त्रीवादाशी बरीच मिळतीजुळती असल्याचे दिसून येते.

संदर्भ-

1)पु.बा.काळे,अनसूयाबाई आणि मी,(संपा:प्रा.सुरेश डोळके),स्वत:१९६२.

2)अश्विनी धोंगडे,**स्त्रीवादी समीक्षा:स्वरूप आणि उपयोजन**,दिलीपराज प्रकाशन१९९३.

3)धनंजय कीर,स.गं,मालशे,**महात्मा फुले:समग्र वाङ्मय**,

4)विलास खोले,(संपा.)**स्त्रीपुरुष तुलना** प्रतिमा प्रकाशन,१९९७.

5)सु.श्री.पांढरीपांडे,"गांधीवाद आणि स्त्रीवाद" स्त्रीवादी समीक्षा-संकल्पना व **उपयोजन**,संपा. मंगला वरखेडे का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था.१९९९.

7)चांगदेव भवानराव खैरमोडे,**डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र**,खंड 3,सुगावा प्रकाशन ,१९९०.

8)म.गं.नातू,दि.य.देशपांडे,**आगरकर वाङ्मय** खंड 1,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,१९८४.